

हैदराबाद गॅझेटसंदर्भातील जी.आर रद्द करा!

समता परिषदेची मागणी

■ धरणगाव । प्रतिनिधी

ओबीसीमध्ये आगोदरच साडे तीनशे पेक्षा जास्त जाती आहेत. त्या जातीनांच पुरेसे प्रतिनिधित्व मिळालेले नाहीये. त्यात पुन्हा एक मोठा वर्ग तुम्ही जर ओबीसी मध्ये समाविष्ट केला तर हा मूळ ओबीसी वर अन्याय होईल. म्हणून शासनाने नवा जीआर तात्काळ रद्द करावा अशी मागणी येथील अखिल भारतीय समता परिषदेतर्फे करण्यात आली. त्या आशयाचे निवेदन त्यांनी तहसीलदारांना दिले.

या प्रसंगी ज्ञानेश्वर महाजन. गुलाबराव वाघ, धनराज माळी . संजय महाजन, पुष्पाताई महाजन, निलेश चौधरी, विठोबा महाजन, रामकृष्ण महाजन, शिवाजी देशमुख, विजय महाजन, कैलास माळी, पुनीलाल महाजन, विलास रामा महाजन,व्ही टी माळी, आर डी महाजन , सुकदेव महाजन, हेमंत माळी , रामकृष्ण महाजन, मोतीलाल महाजन, उमेश महाजन.,तुळशीराम महाजन, वासुदेव महाजन. किरण महाजन . सुभाष महाजन शालिक पाटील, साईनाथ पाटील, प्रमोद जगताप, पिंटू पाटील. दिलीप पाटील . एस डब्लू पाटील, गोरख देशमुख, नितीन नेरपगार, मोहन मांडगे, प्रशांत जगताप, सुनील चौधरी, भागवत चौधरी,नितीन चौधरी, दीपक चौधरी, प्रवीण कुडे, विलास येवले, छोटू जाधव, कैलास जाधव, चंद्रकांत भावसार, उदय सोळंके बापू सोनार, दत्तात्रय सोनार, ईश्वर सोनार, सुनील बडगुजर, मनोहर बडगुजर, गणेश झुंझारराव, कैलास झुंझारराव, ` नगर मोमीन उपस्थित होते. आंदोलन यशस्वीते साठी धनराज माळी, महेंद्र महाजन सुभाष महाजन, भिकन सोनार एम बी पाटील. नाना चौधरी तसेच माळी समाज पंच मंडळ लहान व मोठा माळी वाडा. समता परिषदेचे सर्व पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

पारोळा ब्रह्म उत्सवाला २२ पासून सुरुवात

■ पारोळा । प्रतिनिधी

येथील बालाजी संस्थान कडून सालाबाद प्रमाणे ब्रम्ह उत्सव तयारी सुरु झाली असून दिनांक २२ पासुन सदर उत्सवास सुरुवात होत असल्याची माहिती विश्वस्थ यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी तहसीलदार उल्हास देवरे, सपोनि. चंद्रसेन पालकर,पो. उ. नि. विजय भोंबे, मुख्याधिकारी किशोर चव्हाण, विद्युत विभागाचे गौतम मोरे, आरोग्य विभागाचे दिलीप चौधरी, माजी खासदार ए.टी. पाटील विश्वस्थ श्रीकांत शिंपी, रावसाहेब भोसले, डॉ अनिल गुजराथी, दिनेश गुजराथी,मंगेश तांबे,दिलीप शिरुडकर, केशव क्षत्रिय, संजय कासार,प्रकाश शिंपी, गुणवंत पाटील, अरुण वाणी, प्रवीण कोळी, प्रमोद वाणी, बापू कुंभार, नितीन सोनार,आर्चक हरीश पाठक यांच्यासह सर्व विश्वस्थ, महाप्रसाद समिती सदस्य उपस्थित होते. यावेळी रथ मार्गाच्या रस्त्याची डागडुजी करण्याच्या सूचना दिल्या. तसेच रथ मार्गवर सोलर लाईट लावण्या बाबत चर्चा झाली. वहन उत्सव असा राहील... दिनांक २२.. ध्वज वहन २३ नागाचे वहन २४ चंद्राचे वहन २५ मोराचे वहन २६ वाघाचे वहन २७ घोड्याचे वहन २८ कल्पतरू २९. हत्तीचे वहन ३० सूर्याचे वहन १..मारुतीचे वहन २ गरुडाचे वहन ३ रथ उत्सव ४ अंगद वहन ५ इंद्रसभा वहन तर दिनांक सात रोजी पालखी निघणार आहे. दरम्यान दिनांक २२ ते २६ दरम्यान रोज रात्री कीर्तन कार्यक्रम होईल तर दिनांक दहा रोजी महाप्रसाद व काढा वाटप होईल, काही नवीन वसाहती मध्ये मागणी नुसार वहन नेण्यात येतील अशी माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.

मनवेल येथे बाबाजी धुनिवाले दरबारात भंडारा

■ साकळी, ता.यावल । वार्ताहर

हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री रेवानंद स्वामी गुरु केशवानंद धुनीवाले दादाजी यांचा श्राद्ध सोहळा यंदा दि. १५ सप्टेंबरला मनवेल येथील धुनीवाले दादाजी दरबारात होईल. यानिमित्त सकाळी ७ वाजेपासून सुरू होणारे विविध धार्मिक कार्यक्रम दिवसभर चालतील. भाविकांना ३० क्विंटल गहू व २५ क्विंटल गंगाफळाच्या भाजीचा महाप्रसाद वाटण्यात येईल.मनवेल येथील धुनीवाले दादाजी दरबारात १५ सप्टेंबरला सकाळी ७ वाजता आरती, ८ वाजता सेवा, १० वाजता होमहवन सेवा व दुपारी १२ वाजेपासून महाप्रसाद, दुपारी ४ वाजता पालखी मिरवणूक, रात्री ८ वाजता महाआरती होईल. ठिकठिकाणाहून आलेले भक्त भजनांचे गायन करतील. या उत्सवाच्या पार्श्वभूमीवर मनवेल ग्रामपंचायत व ग्रामस्थांनी स्वच्छता मोहीम राबवली जाते. श्राद्ध सोहळ्याच्या दिवशी घरांसमोर रांगोळ्या काढल्या जातात. सर्वत्र भगवे ध्वज लावले जातात. या सोहळ्यासाठी महाराष्ट्र व मध्य प्रदेशातील धुनीवाले दादाजी भक्त परिवार, विविध राजकीय पदाधिकारी, लोकप्रतिनिधी दर्शनासाठी येतात. या कार्यक्रमासाठी साकळी, शिरसाड, थोरगव्हाण, पथराडे, शिरागड, पिळोदा खुर्द, दगडी येथील भाविकांचे सहकार्य लाभते.

३० हजार भाविक येणार

श्री रेवानंद स्वामींनी काही दिवस मनवेल येथे वास्तव्य केले आहे. त्यांनी भाद्रपद महिन्यात अविधवा नवमीला सन १९३९ या वर्षी मध्य प्रदेशातील अंबाडा (जि.बऱ्हाणपूर) येथे समाधी घेतली. त्या दिवसापासून मनवेल गावी श्री स्वामी रेवानंद गुरु केशवानंद धुनीवाले दादाजींचा श्राद्ध सोहळा साजरा होतो. त्यास महाराष्ट्रासह मध्य प्रदेशातील सुमारे ३० हजार भाविक हजेरी लावलात. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना वरण-पोळी, गंगाफळची भाजी असा महाप्रसाद दिला जातो. दरम्यान, दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना साकळी गावातील बापू धोबी हे दादा भक्तांना दिवसभर मोफत शिरा वाटप करतात. मनवेल येथील महर्षी वाल्मीक मित्र मंडळ पोहे,चहा वाटप करतात. रक्तदान शिबिर घेतले जाते. साकळी-मनवेल दरम्यान मोफत प्रवास सुविधा असते.

विधीलिखित

सुरेशराव बोरकर,
ब्रह्मांड ज्योतिष कार्यालय,
रावेर. मो. : ९८५००१५५५८

शुक्रवार, दि. १२ सप्टेंबर २०२५

-*-* दैनंदिन राशिभविष्य *-*-

मेष – पुर्वजांचे कार्यात मग्न रहाल.
वृषभ – मनात नको त्या शंका येतील.
मिथुन – सर्व कार्यात प्रथम रहाल.
कर्क – नशिबाची परीक्षा आज द्यावी लागेल.
सिंह – नाव लौकिक आज प्राप्त होईल.
कन्या – प्रकृतीकडे लक्ष द्यावे.
तूळ – संसारिक कामात लक्ष द्यावे.
वृश्चिक – नविन ओळखीतून लाभ मिळवाल.
धनू – संतती इच्छुकांना संतती लाभ होईल.
मकर – मातृबोल अनमोल ठरतील.
कुंभ – सत्य-असत्य समजतांना सत्याकडे जाल.

यावल येथील अंधारमळीच्या वनक्षेत्रात राज्यातील पहिले डार्क स्काय पार्क

पाटणादेवीत गणितनगरी, भास्कराचार्य इनोव्हेटिव सेंटर कधी?

मनोहर कांडेकर । चाळीसगाव

जिल्ह्यातील यावल वनविभागातील अंधारमळीच्या वनक्षेत्रात शासनाच्या वतीने राज्यातील पहिले प्रमाणित डार्क स्काय पार्क (गडद आकाश उद्यान) उभारले जाणार आहे. त्यातून संशोधनांसह विज्ञान, पर्यटन, रोजगार आणि ग्रामीण विकासाची वाट सुकर होणार असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. पाटणादेवी येथील गणित नगर व भास्कराचार्य इनोव्हेटिव सेंटरच्या घोषणेनतंर अंधारमळीत राज्यातील पहिले डार्क स्काय पार्क उभारले जात आहे. त्यामुळे जगप्रसिद्ध पाटणदेवी वनक्षेत्रात गणित नगर व भास्कराचार्य इनोव्हेटिव सेंटर कधी होणार असा प्रश्न अभ्यासकांना पडला आहे. कारण लोकप्रतिनिधी या घोषणांच्या माध्यमातून बरेच राजकारण केले असून स्वता; मात्र वाहवाह मिळुन घेतल्याची चर्चा आहे.

नॅशनल स्पेस डे २०२५ च्या निमित्ताने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही महत्त्वाकांक्षी घोषणा केली होती. देशातील पहिले ' डार्क स्काय पॉलिसी ' राबवणारे राज्य म्हणून महाराष्ट्र लवकरच ओळखला जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. त्यानुसार जिल्ह्यातील अंधारमळीत हा प्रकल्प आकाराला येत आहे. त्यामुळे अंधारमळी आता प्रकाशझोतात आले आहे. अंधारमळीच्या वनक्षेत्रात डार्क स्काय पार्क उभारणीला चंद्रग्रहणाच्या मुहूर्तावर शुभारंभ करण्यात आला आहे. डार्क स्काय पार्कमध्ये येणाऱ्या खगोल प्रेमींना रात्रीच्या अंधारात आकाश निरीक्षण करत ग्रह, तारे न्याहाळण्यासाठी खास व्यवस्था केली जात आहे. प्रकाश प्रदूषण मुक्त परिसरात एक वॉचटॉवर उभारण्यात आले असून तिथे आकाश निरीक्षणासाठी खास दुर्बीणची व्यवस्थाही करण्यात आली आहे. त्यामुळे आता दिवसा वन्यजीव दर्शनासोबतच रात्रीला गडद अंधारात आकाश निरीक्षणही करता येणार असल्याची समाधानाची बाब आहे.

चाळीसगाव तालुक्यात पाटणदेवी हे एकेकाळी जागतिक विद्यापीठ म्हणून ओळखले जायचे, येथे जगप्रसिध्द गणित भास्कराचार्य यांनी शून्याचा शोध लावल्याचे सांगीतले जाते. गणिततज्ञ भास्कराचार्य यांच्या रुपाने हा वारासा जागतिक पातळीपर्यंत पोहचला आहे. पाटणादेवी परिसराचे महत्व व भास्कराचार्य यांचे महत्व ओळखून तात्कालीन आ.उन्मेष पाटील यांनी त्याच्या कार्यकाळात सन २०१७ मध्ये निसर्ग संपन्न असलेल्या तालुक्यातील पर्यटन विकासासाठी व जगातील पहिली भास्कचार्य गणितनगरी पाटणादेवी येथे स्थापन करण्याची घोषणा केली होती. तसेच त्याठिकाणी अभ्यासकांचे भव्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. उन्मेष पाटील यांच्या सतत पाठपुरवा केल्यामुळे राज्य शासनाच्या त्यावेळी अर्थसकल्पात गणितनगरीची घोषणा करण्यात आली होती. परंतू उन्मेष

पाटील हे नतंर खासदार झाल्यानतंर हा विषय रेंगाळा, आपल्या खासदारकीच्या कार्यकाळात त्यांच्या ' राजकिय गणितांमुळे ' गणित नगरीच्या वेषयी रेंगाळा, आता गणित नगरीच्या उभारणीचे गणित कोण सोडवणार हा मोठा प्रश्न आहे. कारण आता गेल्या अनेक दिवसांपासून उन्मेष पाटील यांच्याकडून त्यासंबंधीत पाठपुरावा होतांना दिसत नाही.

जानेवारी २०२५ मध्ये चाळीसगावचे आ. मंगेश चव्हाण यांच्यासह एका अभ्यासगटाने अहमदाबाद येथील सायन्स सेंटरला भेट दिली. या अभ्यासदौऱ्यात त्यांनी अहमदाबाद सायन्स सेंटर मधील नाविन्यपूर्ण उपक्रमांचा आढावा घेत माहितीही जाणून घेतली. पाटणादेवी येथे आ.मंगेश चव्हाण यांच्याच प्रयत्नातून राष्ट्रीय पातळीवरील थोर गणितीतज्ञ भास्कराचार्य इनोव्हेटिव सेंटर उभारण्यात येत असून त्यासाठीचं सायन्स सेंटरचा अभ्यास दौरा करण्यात आला होता. तसेच इनोव्हेटिव सेंटर उभारण्याचा प्रस्ताव आ. चव्हाण यांनी राज्य शासनाकडे सादर केला होता. अहमदाबादच्या सायन्स सेंटरमधील गणितासह विकसित केलेले काही अत्याधुनिक माडेल, मनोरंजनात्मक खेळ आणि भास्कराचार्य यांचे जीवनदर्शन इनोव्हेटिव केंद्रात साकारले जाणार असल्याचे सांगण्यात येत होते. यासाठी आ.चव्हाण यांच्या पाठपुराव्यातून राज्य शासनाने २० कोटी रुपयांचा निधीही मंजूर केल्योच सांगण्यात आले. या निधीतून भास्कराचार्य यांच्या जन्मापासून ते त्यांचे गणितातील अतुलनीय योगदान, खगोल क्षेत्रातील त्यांची अभ्यासपूर्ण संशोधने यांचा आढावा मॉडेलच्या रुपात साकारण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. तसेच यामुळे यापरिसरातील पर्यटनाला मोठी चालनाही मिळणार असल्याचा गवगवा करण्यात आला आहे.

उन्मेष पाटील व मंगेश चव्हाण यांच्या गणित नगरी व भास्कराचार्य इनोव्हेटिव सेंटरच्या घोषणे नतंर यावल वनविभागातील अंधारमळीच्या वनक्षेत्रात शासनाच्या वतीने राज्यातील पहिले प्रमाणित डार्क स्काय पार्क (गडद आकाश उद्यान) उभारले जात आहे. परंतू पाटणादेवी येथील गणित नगरी किवा भास्कराचार्य इनोव्हेटिव सेंटर अद्याप उभारले गेले नाही. त्यामुळे हे प्रकल्प कधी उभारले जाणार असा प्रश्न आता अभ्यासकांना पडला असून फक्त राजकारणासाठी घोषणाबाजी केली जाते की प्रत्यक्षात कामे होतात असा देखील सुर आता उमटत आहे.

गोराडखेडा शाळा व्यवस्थापन समितीची निवड

■ गोराडखेडा । वार्ताहर

येथील जि प मराठी शाळेची शाळा व्यवस्थापन समिती पुनर्गठित करण्यात आली.मावळते समिती अध्यक्ष प्रफुल्ल भोईटे यांच्या अध्यक्षते खाली नूतन समिती उपशिक्षक प्रदीप पाटील यांनी कठीत केली.यात शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी माधवराव गोविंदा पवार तर उपाध्यक्षपदी रवींद्र शांताराम पाटील यांची निवड करण्यात आली. तर पालकांमधून सदस्य म्हणून अनिता ज्ञानेश्वर पाटील, उज्वला जगदीश पाटील, रहिमा अफसर शेख, शितल नवल पाटील, सोनाली शांताराम पाटील, रोहिणी प्रफुल्ल भोईटे, वंदना संदीप पाटील, विश्वनाथ बबन अहिरे, शिक्षणप्रेमी मनोज रामदास पाटील, ग्रामपंचायत प्रतिनिधी मनोज पाटील, ,गोपाल हिलाल पाटील, सचिव पदी मुख्याध्यापिका मंदाकिनी पाटील, शिक्षक प्रतिनिधी गौरव विजय येवले, विद्यार्थी प्रतिनिधी खुशाल गोकुळ पाटील, आरती विश्वनाथ मोरे यांची सर्वानुमते निवड करण्यात आले. किार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती स्वाती पाटील यांनी तर आभार प्रदर्शन श्रीमती उज्वला सोनार यांनी मानले.

देशदूत
हे दैनिक मुद्रक व प्रकाशक **राजेंद्र कृष्णराव सोनवणे** यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि.यांच्याकरिता सकाळ मीडिया प्रा.लि., प्लॉट नं.सी-३, एम.आय.डी.सी.एरिया टेलिफोन एक्सचेंजसमोर, औरंगाबाद रोड, जळगाव-४२५००३ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करुन देशदूत कार्यालय, ई-७/९, व.वा.मार्केट (गोलाणी मार्केट) दुसरा मजला, नवी पेठ जळगाव येथे प्रसिध्द केले. ● **संपादक : हेमंत दिनेश अलोने*. फोन नं.**: जळगाव शहर कार्यालय-२२२८७८१, २२२४६६०, भुसावळ-२२०६८०, २२४७९५, रावेर-२५०४४४, धुळे-२३७९१४, फॅक्स-२३८९१४, नंदुरबार २२११०१. **RNI.No. 68337/1997** पोस्टाने पाठविण्याचा परवाना क्र. **JAL./123/2018-2020** (* पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.)